**ठळक बातम्या**

- ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं नवी दिल्लीत उद्या प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन, राज्य सरकारकडून ४ कोटी रुपयांचा निधी
- भाजपा नेत्या रेखा गुप्ता यांनी घेतली दिल्लीच्या मुख्यमंत्री पदाची शपथ
- विविध भारतीय कायद्यांचं काटेकोर पालन करण्याचे केंद्र सरकारचे OTT माध्यमांना दिशानिर्देश
- आशियाई स्नूकर अजिंक्यपद स्पर्धेत पंकज अडवाणीला चौदावं सुवर्ण पदक

**आणि**

- आयसीसी चँपियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत बांगलादेशाचं भारतापुढं विजयासाठी २२९ धावांचं लक्ष्य

**<><><><><>**

९८ वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन उद्यापासून दिल्लीत सुरु होत आहे. डॉ. तारा भवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या संमेलनाचं उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित असतील. सकाळी साडे ९ वाजता ग्रंथ दिंडीला सुरुवात होईल. त्यानंतर दुपारी साडे ३ वाजता विज्ञान भवनात उद्घाटन समारंभ होणार आहे.

संध्याकाळी साडे ६ वाजता माजी केंद्रीय मंत्री सुशील कुमार शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली दुसरे उद्घाटन सत्र होईल. त्यात गेल्या संमेलनाचे अध्यक्ष रवींद्र शोभणे आणि या संमेलनाच्या अध्यक्ष तारा भवाळकर यांचं भाषण होईल. दिल्लीतल्या तालकटोरा क्रीडा संकुलात उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराज साहित्यनगरीत तीन दिवस चालणाऱ्या या संमेलनात, मान्यवरांच्या मुलाखती, बहुभाषिक कवी संमेलन, विविध विषयावर परिसंवाद, आदी कार्यक्रम होणार आहेत.

राज्य सरकारनं उद्यापासून या संमेलनाला एकूण ४ कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय घेतला आहे. दरवर्षी साहित्य संमेलनासाठी २ कोटी रुपये दिले जातात. मात्र या संमेलनाचं उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याहस्ते होणार आहे. साहित्यिक आणि साहित्य रसिकांवरचा वाढलेला खर्च, संमेलनाचं वेगळेपण यासारख्या कारणांमुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संमेलनासाठी अतिरीक्त २ कोटी रुपये द्यायला विशेष बाब म्हणून मंजुरी दिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची बैठक घेतली. या बैठकीला केंद्रीय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंह आणि जे.पी.नड्‌डा देखील उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह आंध्र प्रदेश, ओडिशा, मध्य प्रदेश, राजस्थान, दिल्लीचे

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री तसंच उत्तर प्रदेश आणि बिहारचे उपमुख्यमंत्री या बैठकीला उपस्थित होते.

**<><><><><>**

भाजपा नेत्या रेखा गुप्ता यांनी आज दिल्लीच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. रामलीला मैदानावर झालेल्या या सोहळ्यात दिल्लीचे नायब राज्यपाल वी.के. सक्सेना यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

गुप्ता यांच्यासह ६ कॅबिनेट मंत्र्यांनीही आज शपथ घेतली. यामध्ये परवेश साहिब सिंह वर्मा, आशीष सूद, मनजिन्दर सिंह सिरसा, रविंद्र इन्द्राज सिंह, कपिल मिश्रा आणि पंकज कुमार यांचा समावेश आहे. शपथविधीनंतर लगेच गुप्ता यांनी पदभार स्वीकारला आणि खातेवाटप जाहीर केलं. त्यांच्याकडे मुख्यमंत्री पदासह गृह, वित्त, नियोजन यासारखी महत्त्वाची खाती असतील. परवेश वर्मा यांच्याकडे शिक्षण, सार्वजनिक बांधकाम तसंच परिवहन विभागाचा कार्यभार देण्यात आला आहे. गुप्ता यांनी संध्याकाळी वासुदेव घाटावर यमुना आरती केली.

**<><><><><>**

ओटीटी माध्यमं आणि त्यांच्या नियामक संस्थांसाठी माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने दिशानिर्देश जारी केले आहेत. माहिती तंत्रज्ञान नियम २०२१ अनुसार भारताचे कायदे आणि आचारसंहितेचं काटेकोरपणे पालन व्हावं

यासाठी हा सल्ला जारी करण्यात आला आहे. प्रसारित होणाऱ्या आशयाचं प्रेक्षकाच्या वयाच्या टप्प्यानुसार केलेलं वर्गीकरण योग्य रितीने करावं, असे निर्देशही त्यात दिले आहेत. ओटीटी माध्यमांवर अश्लील, बीभत्स आशयाच्या प्रसारणाबाबत विविध संसद सदस्य तसंच वैधानिक संस्थांच्या प्रतिनिधींकडून तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. त्यावरून हे दिशानिर्देश जारी करण्यात आले आहेत.

**<><><><><>**

मुख्य आर्थिक सल्लागार डॉक्टर व्ही. अनंत नागेश्वरन यांचा कार्यकाळ २ वर्षांनी वाढवून मार्च २०२७ पर्यंत करण्यात आला आहे. अर्थ मंत्रालयाने आज या संदर्भातला आदेश जारी केला आहे. डॉक्टर नागेश्वरन यांनी जानेवारी २०२२मध्ये मुख्य आर्थिक सल्लागार म्हणून पदभार स्वीकारला होता.

**<><><><><>**

दक्षिण अफ्रिकेत होणाऱ्या जी २० देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीसाठी परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर हे जोहान्सबर्ग इथं पोहोचले आहेत. या बैठकीच्या आधी त्यांनी ब्राझीलचे परराष्ट्र व्यवहार मंत्री माओरो व्हिएरा तसंच सिंगापूरच्या परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांची भेट घेतली.

**<><><><><>**

जगात विविध देशांमध्ये सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत विकासाची उद्दिष्ट गाठणं आव्हानात्मक बनल्याचं प्रतिपादन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी आज केलं. ते आज पुण्यात परराष्ट्र

मंत्रालय आणि पुणे इंटरनॅशनल सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने सहाव्या एशिया इकोनॉमिक डायलॉग या वार्षिक परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. या तीन दिवसांच्या परिषदेत ऑस्ट्रेलिया, इजिप्त, इंडोनेशिया, जपान, नेपाळ, नेदरलँड्स, सिंगापुर, दक्षिण आफ्रिका आणि श्रीलंका या देशांतले धोरणकर्ते, शिक्षणतज्ज्ञ आणि उद्योग तज्ज्ञ सहभागी झाले आहेत.

**<><><><><>**

भारत आणि बांगलादेश यांच्यातली ५५ वी महासंचालक स्तरीय सीमा परिषद आज नवी दिल्लीत झाली. भारतातर्फे सीमा सुरक्षा दलाचे महासंचालक दलजित सिंह चौधरी आणि बांगलादेशच्या बॉर्डर गार्डचे महासंचालक मेजर जनरल मोहम्मद सिद्दीकी यांनी भाग घेतला. या परिषदेत घुसखोरी, सीमा भागातले गुन्हे, सीमेवर तारेचं कुंपण, तस्करी आणि इतर महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली. सीमाभागातल्या लोकांच्या मानव अधिकाराचं रक्षण आणि सीमेवरील हिंसाचार कमी करण्याबाबतही चर्चा करण्यात आली.

**<><><><><>**

भुतानचे प्रधानमंत्री शेरिंग तोबगे ३ दिवसांच्या भारत भेटीसाठी आज नवी दिल्लीत दाखल झाले. या दौऱ्यात ते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतील.

**<><><><><>**

आशियाई स्नूकर अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय स्नूकरपटू पंकज अडवाणी यानं चमकदार कामगिरीचं प्रदर्शन करत चौदावं सुवर्ण पदक पटकावलं. ९३

आणि ६६ च्या ब्रेकसह त्याने सामन्यावर आपलं वर्चस्व कायम ठेवलं. तसंच आपल्या अचूक रणनितीनं प्रतिस्पर्धी खेळाडूला मात दिली.

या स्पर्धेत विजय मिळवल्यानंतर तो एकाच वर्षात राष्ट्रीय, आशियाई आणि जागतिक स्नूकर स्पर्धा जिंकणारा खेळाडू ठरेल. बिलियर्ड्समधे त्याने हा विक्रम याआधीच केला आहे.

**<><><><><>**

आयसीसी चँपियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज दुबईत सुरु असलेल्या सामन्यात बांगला देशानं भारतापुढं विजयासाठी २२९ धावांचं लक्ष्य ठेवलं आहे.

बांगला देशानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला. मात्र त्यांची सुरुवात खराब झाली. ९व्या षटकात ५ बाद ३५, अशी त्यांची स्थिती झाली. मात्र त्यानंतर तोव्हिद हृदोय आणि जाकीर अली यांनी डाव सावरला. त्यांनी सहाव्या गड्यासाठी १५४ धावांची भागिदारी केली. तोव्हीदनं शतक झळकावलं, तर जाकीरनं ६८ धावा केल्या. मात्र इतर फलंदाजांना चांगली कामगिरी करता आली नाही. त्यामुळे त्यांचा डाव दोन चेंडू बाकी असताना २२८ धावांवर संपला. भारतातर्फे महंमद शमीनं ५, हर्षित राणानं ३, तर अक्षर पटेलनं २ गडी बाद केले. महंमद शमीनं आंतरराष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेटमधे २०० बळींचा टप्पा गाठला. तो सर्वात जलद हा टप्पा गाठणारा भारतीय खेळाडू ठरला.

भारताच्या डावाची सुरुवात चांगली झाली. कर्णधार रोहित शर्मा ४१ धावांवर बाद झाला, मात्र त्यानं त्याच्या आंतरराष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेट

कारकिर्दीतल्या ११ हजार धावा पूर्ण केल्या. विराट कोहलीच्या खालोखाल सर्वात जलद हा टप्पा गाठण्यात त्यानं दुसरं स्थान मिळवलं आहे.
शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या २३ षटकात २ बाद ११२ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत नागपूर इथं सुरु असलेल्या विगर्भाविरुद्धच्या उपांत्य सामन्यात आज चौथ्या दिवसअखेर मुंबई ३२३ धावांनी पिछाडीवर आहे. विदर्भाचा दुसरा डाव आज २९२ धावांवर संपला. पहिल्या डावातल्या ११३ धावांच्या आघाडीमुळे त्यांची एकूण आघाडी ४०५ धावांची झाली. या धावसंख्येपुढं दुसऱ्या डावात मुंबईची सलामीची फलंदाजी ढेपाळली. आजचा खेळ थाबला तेव्हा मुंबईच्या ३ बाद ८३ धावा झाल्या होत्या.
अहमदाबाद इथं सुरु असलेल्या केरळविरुद्धच्या उपांत्य सामन्यात गुजरातनं आद दिवसअखेर ७ बाद ४२९ धावा केल्या. प्रियंक पांचालनं १४८ धावा केल्या. आजचा खेळ थांबला तेव्हा जयमीत पटेल ७४, तर सिद्धार्थ देसाई २४ धावांवर खेळत होता.

**//<><><><><>//**